महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
708, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे- 411030

संपर्क क्रमांक (०२०)२४४७८१२२ ईमेल : mathsdept@maa.ac.in

जा.क्र./राशैसंप्रपम/गवि/ग.ऑलिंपियाड.स्पर्धा/२०२५-२६/ दिनांक: ३१/१०/२०२५

प्रति,

1. विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व)
2. उपसंचालक, प्रादेशिकविद्याप्राधिकरण, (सर्व)
3. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
4. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई.
5. शिक्षणाधिकारी (प्राथमिक /माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)
6. शिक्षण निरीक्षक, (पश्चिम, दक्षिण, उत्तर), मुंबई.
7. प्रशासन अधिकारी, म.न.पा. / न.पा.(सर्व)

विषय: शिक्षक व अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी गणित ऑलिंपियाड स्पर्धेचे आयोजन करणेबाबत...

संदर्भ: १. मा. संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडील पत्र दि. १०/१०/२०२५.
२. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडील पत्र दि.१७/१०/२०२५.
३. शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये,राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणा-या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळामधील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी, DIET मधील अधिकारी,कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षकीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृध्दिंगत करणे, त्यांच्यात समन्वय सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजीटल भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, विभाग व राज्यस्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून करण्यात येत आहे.

या स्पर्धांच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा एकूण ४३ विषयांवर आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धांचे निकष व नियमावली बाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. त्यापैकी **गणित ऑलिंपियाड** स्पर्धा आयोजनाची जबाबदारी राज्यस्तरावर गणित विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्याकडे देण्यात आलेली आहे.

या स्पर्धेसाठी अभ्यासक्रम सोबतच्या नियमावलीमध्ये दिलेला असून त्याबाबत सर्व स्पर्धकांना आपल्या स्तरावरून अवगत करण्यात यावे. प्रश्नपत्रिका व उत्तरसूची गणित विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या मार्फत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या अधिकृत मेलवर उपलब्ध करून देण्यात येईल. सदर स्पर्धेसाठी संबंधित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी गणित ऑलिंपियाड स्पर्धेच्या आयोजनासाठी नोडल अधिकारी यांची नियुक्ती करून त्यांचे नामनिर्देशन खालील शीट मध्ये भरावी.

लिंक
https://docs.google.com/spreadsheets/d/1TTXUzzNNUKT_0B7eYlfqPIvPgdqdhiEqwuuXkkzjxok/edit?usp=sharing

या स्पर्धेसाठी स्तरनिहाय प्रश्न पत्रिका व उत्तर सूची गणित विभाग, प्रस्तुत कार्यालय यांच्यामार्फत उपलब्ध करून देण्यात येईल. स्पर्धकांच्या संख्येनुसार आवश्यक प्रिंट आपल्या स्तरावर उपलब्ध करून देण्यात याव्यात. उत्तरपत्रिका तपासणी व आवश्यक सर्व कामकाज आपल्या स्तरावर विहित कालावधीत पूर्ण करावे. या सर्व कामकाजात गोपनियता असणे अत्यंत आवश्यक आहे. सदर स्पर्धेच्या आयोजनासाठी तालुका व विभाग स्तरावर सनियंत्रण समितीचे गठण करण्यात यावे.

प्रत्येक टप्प्यावरील समितीच्या कामकाजाचे इतिवृत्त संबंधित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी तयार करून गणित विभाग, प्रस्तुत कार्यालयास सादर करण्यात यावे .

स्पर्धेची सविस्तर नियमावली सोबत देण्यात येत असून त्याचे अवलोकन करण्यात यावे.

Digitally signed by
Ibrahim Pirsaheb Nadaf
Date: 04-11-2025
14:19:48

( डॉ. इब्राहीम नदाफ )
उपसंचालक (समन्वय विभाग)
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

## शिक्षक व अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी गणित ऑलिंपियाड स्पर्धा नियमावली

राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणा-या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील सध्या सेवेत कार्यरत असणारे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, DIET मधील अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षकीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृध्दिंगत करणे, त्यांच्यात समन्वय सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजीटल भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, विभाग व राज्यस्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन या स्पर्धांच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा एकूण ४३ विषयांवर आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धांचे निकष व नियमावली बाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. त्यापैकी **गणित ऑलिंपियाड** स्पर्धा आयोजनाची जबाबदारी राज्यस्तरावर गणित विभाग, SCERT, पुणे यांच्याकडे देण्यात आलेली आहे.

### उद्दिष्ठ:

- शिक्षक ,अधिकारी/कर्मचारी यांच्यामध्ये निरोगी व पोषक स्पर्धात्मक वातावरण निर्मिती करणे.
- गणित विषयातील प्रावीण्य गणित ऑलिंपियाडच्या माध्यमातून तपासून शिक्षक व्यावसायिक क्षमता वृद्धीसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाची आखणी करणे.
- गणित विषयाबाबत अभिरुची विकसित करणे.
- उत्कृष्ट गणित शिक्षकांचे राज्यस्तरीय बेंचमार्क निश्चित करणे.

### गणित ऑलिंपियाड स्पर्धेसाठी सर्वसाधारण नियम:

1. या स्पर्धेचे आयोजन हे तालुकास्तर, विभागस्तर व राज्यस्तरावर करण्यात येणार आहे.
2. स्पर्धेच्या नाव नोंदणीसाठी राज्यस्तरावरून लिंक देण्यात येईल.
3. स्पर्धेसाठी शिक्षक नावनोंदणी करण्याची जबाबदारी केंद्रप्रमुख यांच्यावर सोपविण्यात आली आहे.
4. प्रत्येक केंद्रप्रमुख यांनी आपल्या केंद्रातून किमान एक शिक्षक स्पर्धेमध्ये सहभागी होईल यासाठी प्रोत्साहित करावे. सहभागी स्पर्धकांची याबाबत लेखी संमती घ्यावी.
5. सहभागी स्पर्धकाची माहिती राज्यस्तरावरून पुरविण्यात आलेल्या लिंकवर नोंदवावी.
6. सर्व स्पर्धेसाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक अधिकारी व कर्मचारी यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्मद्वारे संकलित केले जाईल.
7. दि. ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत केंद्रप्रमुख यांनी स्पर्धकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.
8. या स्पर्धांची तयारी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची सुट्टी घेता येणार नाही तसेच शिक्षकांच्या सहभागामुळे अध्ययन-अध्यापनाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.
9. तालुकास्तरावरील प्रत्येक स्पर्धेचा विजेता स्पर्धक विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र राहील.
10. विभाग स्तरावरील प्रथम पाच क्रमांकाचे विजेते राज्यस्तरावर सहभागासाठी पात्र राहतील.
11. राज्यस्तरावर सहभागी स्पर्धकांपैकी प्रथम दहा स्पर्धक विजेते म्हणून निवडण्यात येतील.
12. स्पर्धेच्या नियमावली सोबत जोडलेल्या समितीच्या बैठकीचे आयोजन करून स्पर्धेविषयी माहिती द्यावी.

### गणित ऑलिंपियाड स्पर्धेचे स्वरूप:

1. इयत्ता १ ली ते १२ साठी अध्यापन करणारे शिक्षक तसेच अधिकारी व कर्मचारी हे स्पर्धेत सहभागी होवू शकतात.
2. गणित ऑलिंपियाड स्पर्धा लेखी चाचणी स्वरुपात (ऑफलाईन/ऑनलाईन) घेण्यात येईल.
3. स्पर्धा वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असेल.
4. एकूण १०० गुणांची प्रश्नपत्रिका असेल व वेळ ९० मिनिटे असेल. प्रत्येकी दोन गुणांचे ५० प्रश्न. सदर प्रश्नपत्रिकेमध्ये पुढीलप्रमाणे २ विभाग असतील.

- विभाग १: उपयोजित गणित (Practical Mathematics) : ३० प्रश्न
- विभाग २: आव्हानात्मक (Achiever's Section): २० प्रश्न

5. प्रश्नपत्रिका द्विभाषिक असेल. (मराठी व इंग्रजी)
6. सर्व प्रश्न अनिवार्य असतील.
7. नकारात्मक गुणदान पद्धती लागू राहील.
8. प्रस्तुत स्पर्धेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तर पत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच उमेदवारांनी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. **प्रत्येक प्रश्न २ गुणांचा असल्याने उत्तरपत्रिकेत सोडवलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक गुण वजा करण्यात येतील.**
9. पेपर सोडविण्यासाठी निळा अथवा काळा बॉलपेन वापरावा.
10. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.
11. स्पर्धेचे स्वरूप तालुकास्तर, विभागस्तर व राज्य स्तरासाठी मुद्दा क्र. १ ते १० नुसार असतील.

**अभ्यासक्रम:** इ. १ ली ते १० वीचा गणित विषयाचा प्रचलित अभ्यासक्रम व पाठ्यक्रम.

**तालुकास्तरीय स्पर्धेचे आयोजन :**

- तालुकास्तरीय स्पर्धेचे आयोजन गटशिक्षणाधिकारी यांनी करावे.यामध्ये परीक्षा केंद्र निवड,परीक्षा केंद्रावरील आवश्यक सुविधा, पर्यवेक्षक नियुक्ती व अनुषंगिक मनुष्यबळ उपलब्धता इ. बाबींचा समावेश असेल.
- स्पर्धेचे सनियंत्रण प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी करावे. यामध्ये प्रश्नपत्रिका उपलब्धता, वेळेचे नियोजन व गोपनीयता संबंधित बाबी, स्पर्धेचे मूल्यांकन व अंतिम निकाल इ. बाबींचा समावेश असेल.
- स्पर्धकांच्या संख्येनुसार आवश्यक प्रिंट तालुका स्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने, विभाग स्तरावर प्रादेशिक विद्या प्राधिकरण किंवा आयोजक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी तर राज्य स्तरावर गणित विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे यांच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात येतील.

**विभागस्तरीय स्पर्धेचे आयोजन :**

- विभागस्तरीय स्पर्धांचे आयोजन विभागातील सर्व जिल्ह्यांच्या सहभागाने मुंबई, नागपूर व छत्रपती संभाजी नगर या विभागांसाठी अनुक्रमे प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर यांनी व उर्वरित विभागांसाठी विभाग मुख्यालयाच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने करावे.
- यासाठी विभागीय शिक्षण उपसंचालक यांचीही मदत घ्यावी. यामध्ये परीक्षा केंद्र निवड,परीक्षा केंद्रावरील सुविधा,पर्यवेक्षक नियुक्ती व अनुषंगिक मनुष्यबळ उपलब्धता, प्रश्नपत्रिका उपलब्धता, वेळेचे नियोजन व गोपनीयता संबंधित बाबी,स्पर्धेचे मूल्यांकन व अंतिम निकाल इ. बाबींचा समावेश असेल.
- स्पर्धकांच्या संख्येनुसार आवश्यक प्रिंट प्रादेशिक विद्या प्राधिकरण किंवा आयोजक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्यामार्फत उपलब्ध करून देण्यात येतील.

**राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन :**
राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र ,पुणे मधील गणित विभागामार्फत करण्यात येईल.

**मूल्यमापन:**

- उत्तरपत्रिका तपासणी व आवश्यक सर्व कामकाज आपल्या स्तरावर विहित कालावधीत पूर्ण करावे. उत्तरपत्रिका तपासणीसाठी डी.एड. प्राचार्य / अध्यापकाचार्य यांचा समावेश करावा. या सर्व कामकाजात गोपनीयता असणे अत्यंत आवश्यक आहे. सदर स्पर्धेच्या ऑयोजनासाठी तालुका, विभाग व राज्यस्तरावर सनियंत्रण समिती गठीत करण्यात यावी.

- गणित ऑलिंपियाड स्पर्धा परीक्षेचे मूल्यमापन तालुका स्तरावर निश्चित केलेल्या समितीद्वारे, विभागस्तरीय मूल्यमापन विभाग स्तरावर निश्चित केलेल्या समितीद्वारे तर राज्यस्तरीय मूल्यमापन राज्य स्तरावर निश्चित केलेल्या समितीद्वारे होईल. मूल्यमापन केल्यानंतर विविध समित्यांनी आपल्या स्तरावर सर्व प्रश्न पत्रिकांचे जतन करून ठेवावे.

**स्पर्धेचे वेळापत्रक-**

सदर स्पर्धा तालुका, विभाग व राज्यस्तरावर आयोजित करण्यात येणार आहे. त्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे -

१. तालुकास्तरीय स्पर्धा : नोव्हेंबर २०२५ (चौथा शनिवार)

२. विभागस्तर स्पर्धा : डिसेंबर २०२५ (चौथा शनिवार )

३. राज्यस्तर स्पर्धा : जानेवारी २०२६ (चौथा शनिवार)

स्पर्धांच्या आयोजनासंदर्भात राज्य स्तरावरून निर्गमित करण्यात आलेल्या दि.१०.१०.२०२५ च्या पत्रातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे.